प्रकाश जोशी

# चुकावेत असे काही !

PAGE NO.: १
DATE / /

लोकसभा निवडणुका पार पडल्या. नवी राजवट आली. नवे पंतप्रधान गादीवर आरूढ झाले. आता त्यांच्या धोरणांबद्दल लोक निरनिराळे तर्क करू लागणारच. त्यांनी धोरणे कोणती आखावीत आणि कशी राबवावीत या-बद्दल अनाहूत सल्ले लोक देणारच. माझी मात्र असले तर्क करण्याची आणि सल्ले देण्याची पात्रता नाही. पण पंतप्रधान कोणत्या गोष्टी करणार नाहीत, कोणती धोरणे आखणार नाहीत, याची कल्पना मी करू शकतो. नव्हे, याबाबत मी काही आडाखेही बांधले आहेत. पाहू या, पंतप्रधान ते खरे ठरवितात का खोटे!

पंतप्रधानांनी कोणती धोरणे आखावीत आणि ती कशी राबवावीत, असले सल्ले जे देत असतात किंवा त्याबाबत आडाखे बांधीत असतात, त्यांना, त्यांचे आडाखे चुकले तर दुःख होणार. पण माझी गोष्ट निराळी आहे. पंतप्रधानांनी माझे आडाखे चुकीचे ठरविले, तर मला आनंदच होणार आहे! ज्या गोष्टी पंतप्रधानांना शक्य नाहीत, असे मी म्हणतोय, त्या गोष्टी त्यांनी करून दाखविल्या तर मला धन्य वाटेल.

पंतप्रधान एक नामवंत अर्थतज्ज्ञ आहेत. अर्थशास्त्रात त्यांनी डॉक्टरेट मिळविली आहे. ती सुद्धा एका जगप्रसिद्ध विद्यापीठातून. तेव्हा अर्थशास्त्राचे सर्व सिद्धांत ते कोळून प्यायले असणार, असं समजायला हरकत नाही. ज्या उदारीकरणाच्या, जागतिकीकरणाच्या धोरणाचे ते भारतातले पहिले पुरस्कर्ते ठरले, त्या व्यापक (मॅक्रो) अर्थशास्त्राचा उद्गाता आहे जॉन मेनार्ड केन्स हा प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ. त्याच्या म्हणण्याप्रमाणे समाजासाठी वस्तू आणि सुविधा यांचे जास्तीत जास्त उत्पादन करणे, हे अर्थव्यवस्थेचे ध्येय

असले पाहिजे. त्यामध्ये कुठे असमय येऊन मागणी आणि पुरवठा यांत असमतोल निर्माण झाला, विशेषत: वस्तूंना, मालाला मागणी नसल्यामुळे उत्पादनाच्या क्रिया बंद पडू लागल्या, तर सरकारने हस्तक्षेप करून, भांडवल ओतून, उत्पादनाला चालना दिली पाहिजे आणि अर्थव्यवस्थेला मंदीच्या खाईतून बाहेर काढली पाहिजे. १९२९-१९३३ या वर्षांत युरोप-अमेरिकेत जी मंदीची लाट आली, तिला शेवट सरकारने परिणामकारक हस्तक्षेप केल्यानेच रोखू शकले. जागतिकीकरण, उदारीकरण यांचे उद्दिष्ट जागतिक पातळीवर वस्तू आणि सुविधा यांचे उत्पादन सतत वाढविणे हेच आहे.

पण त्याच केन्सने असेही म्हटले आहे की उत्पादनाचा सर्वांत कार्यक्षम आणि कमी खर्चाचा प्रकार म्हणजे स्थानिक निसर्ग-संपत्तीवर आधारलेले आणि स्थानिक जनतेच्या गरजा पुरविणारे उत्पादन. याउलट आयात-निर्यातीद्वारे दूरस्थ लोकांच्या गरजा भागविण्यासाठी उत्पादन करणे केव्हाही अतिखर्चिक आणि अंतिमत: नुकसानीत येणारे असते! केन्सच्या म्हणण्याप्रमाणे जागतिकीकरणाचा पहिला टप्पा, त्याचा पाया, म्हणजे स्थानिक निसर्गसंपत्तीच्या जोरावर स्थानिक जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे आणि तिथूनच वस्तू आणि सुविधा यांचे उत्पादन वाढविण्यास सुरुवात करणे. आश्चर्य म्हणजे या बाबतीत केन्स आणि म. गांधी हे समविचारी आहेत! दोघांनीही स्थानिक पातळी-वरील स्वयंपूर्णतेवर — खेडी किंवा लहान गावे — यांच्या स्वयंपूर्णतेवर भर दिला आहे.

माझी खात्री आहे की जागतिकीकरणाचा, उदारी-करणाचा पाठपुरावा करताना, त्यावेळच्या अर्थमंत्र्यांच्या आणि आजच्या पंतप्रधानांच्या आठवणीत केन्सचे वरील

उद्गार नक्कीच नसतील. म्हणूनच स्थानिक पातळी-वरील निसर्ग-संपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन आणि त्यातून ग्रामपातळीवर उत्पादने, रोजगार, नोकऱ्या यांची निर्मिती, हा पंतप्रधानांच्या धोरणाचा भाग असणार नाही, असे मी खात्रीपूर्वक म्हणू शकतो!

पंतप्रधानांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे ते शेतीतील गुंतवणूक वाढण्यास चालना देतील. पण ही शेती असेल हरित क्रांतीच्या पद्धतीची. सुधारित, शास्त्रीय पद्धतीने (जनुक बदल करून) तयार केलेले बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशके वापरणारी आणि सिंचनाचा भरपूर उपयोग करणारी. शेती हा स्थानिक निसर्ग-संपत्तीच्या संवर्धनाचाच एक भाग असू शकतो असा विचार पंतप्रधान करू शकणार नाहीत!

शिवाय मला असेही वाटते की शेती सुधारणा, शेतीचे उत्पादन वाढवून शेतमालावरील उद्योगांना उत्तेजन देण्याचा पंतप्रधानांचा उद्देश जरी असला तरी शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा सध्याचा बोजा कमी करण्याचे धोरण ते हेतुपूर्वक आखणार नाहीत. हा बोजा खरोखरच कमी करायचा असेल तर प्रक्रिया उद्योगांपेक्षा स्थानिक निसर्ग-संपत्तीचा संवर्धनातून तिचा योग्य, चिरंजीवी वापर होईल असे उपजीविकेचे पर्यायी मार्ग शोधणे आवश्यक होईल. स्थानिक निसर्गाकडे दुर्लक्ष झाले तर ही गोष्ट शक्य होणार नाही.

शेतीची सुधारणा, शेतीविषयक गुंतवणुकीला प्राधान्य, म्हणजे पाणीव्यवस्था, जलव्यवस्थापन यांना विचार आवाका. नद्या जोडण्याच्या प्रकल्पाला पुरस्कार वाजपेयी सरकारच्या हिरीरीने आजचे पंतप्रधान बहुधा करणार नाहीत. पण म्हणून आजच्या जलव्यवस्थापनातील

त्रुटी, विशेषत: अवाढव्य खर्च आणि पाणी-वाटपातील विषमता कमी करण्याच्या गांभीर्याने ते विचार करतील असे वाटत नाही. विशेषत: प्रत्येक भारतीयाला चांगल्या दर्जाचे किमान पाणी (दर दिवशी, माणशी ५०-६० लिटर) मिळाले पाहिजे, असा आग्रह त्यांच्या धोरणात असणार नाही, याची मला खात्री आहे.

एक-दोन वर्षे अवर्षणाची गेली की आजच्या जलव्यवस्थापनातील त्रुटी विशेषच जाणवतात. धरणे, कालवे यांवर प्रचंड खर्च होऊनही स्थानिक पातळीवर जनता अजून पाऊस पडणे वा न पडणे यांवरच अवलंबून आहे, हे लक्षात येते. पावसाचा प्रत्येक थेंब साठविणे हा उपायही तात्कालिक स्वरूपाचाच आहे. दीर्घकालीन टिकाऊ उपाय म्हणजे स्थानिक ओढे, नद्या यांची योग्य काळजी घेणे, त्यांच्याकडून भूगर्भात, आजूबाजूच्या प्रदेशात पाणी झिरपेल, जिरेल अशा क्रिया करवून घेणे, त्या चालू ठेवणे, हे होत. खरं तर स्थानिक निसर्ग-संपत्तीच्या संवर्धनातच या गोष्टी अंतर्भूत होतात. पण व्यापक (मॅक्रो) अर्थशास्त्राचा विचार करणाऱ्या पंतप्रधानांना इतक्या सूक्ष्म पातळीवर उतरणे शक्य होणार नाही याची मला खात्री आहे!

म्हणजेच आजची जलव्यवस्थापन पद्धती अशीच चालू राहणार; शेती, तिवरील प्रक्रिया उद्योग, तिच्यासंबंधित पूरक उद्योग यांच्या वाढीची आजचीच दिशा पंतप्रधान चालू ठेवणार. मग या सर्वांना परिणाम आजच्याप्रमाणे भुरक्यात! शहरवासियांच्या गरजा पुरविण्यातच होणार. वस्तू आणि सुविधा यांचे उत्पादन वाढण्यावर पंतप्रधान आजच्यासारखाच भर देणार

असतील. तर शहरवासियांनाच त्यांचा फायदा जास्त होणार. म्हणजेच माणसे आणि माल यांची शहरातील आवक वाढत जाणार. शहरांची वाढ होतच राहणार! त्यांना सुविधा पुरविण्याचा खर्च वाढत जाणार आणि त्यासाठी आसपासच्या निसर्गाची हानी होतच राहणार. म्हणजेच दूरस्थ लोकांच्या गरजा पुरविणे हे अतिखर्चीचे आणि अंतिमतः आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे, या केन्द्राच्या उद्-गारांना प्रत्यय स्थानिक जनतेला येत राहणार!

म्हणूनच शहरांची वाढ थांबविण्यासाठी परिणाम-कारक उपाय योजणे, पंतप्रधानांच्या कक्षेत येणार नाही, तसे त्यांचे धोरण असणार नाही, याची मला खात्री आहे!

आजच्याच वेगाने शहरांची वाढ यापुढेही चालू राहणार असेल तर त्यांच्यासाठी जागा पुरविणे, रस्ते, महा-मार्ग, लोहमार्ग, विमानतळ, पाणी-पुरवठा, कच-याची विल्हेवाट अशा सुविधांमध्ये वाढ करणे प्राप्त आहे. वाजपेयी सरकारच्या महामार्ग बांधण्याच्या कार्यक्रमाची भलावण पंतप्रधानांनी केलीच आहे. मात्र हे महामार्ग बांधताना निसर्गाची प्रचंड उलथापालथ होते. एक किलो-मीटर रस्ता बांधण्यास दहा हजार टन दगड-माती इकडून तिकडे हलवावी लागते. यामध्ये हजारो जीवांची (कीटक, सरपटणारे प्राणी, पशुपक्षी आणि वनस्पती) हत्या होते. त्यांची घरे-आसरे नष्ट होतात. एका संशोधना-ला आढळले की महाबळेश्वरसारख्या पर्यटनस्थळी येणा-या-जाणा-या वाहनांखाली दररोज सुमारे ५० साप (निरनिराळ्या जातींचे) चिरडले जातात! यांवरून लक्षात येईल की असल्या सुविधा पुरविताना कोणत्या प्रमाणात निसर्गाचा नाश होतो!!

PAGE NO.: ५
DATE / /

~~म्हणूनच~~ तरीही मात्री खात्री आहे की निसर्ग-संरक्षण, निसर्ग-संवर्धन, पर्यावरण रक्षण यासाठी परिणामकारक उपाययोजना पंतप्रधानांच्या धोरणात दिसणार नाही.

शहरवासियांच्या गरजा पुरविण्यासाठी उत्पादन मुख्यत: होणार असेल तर आजच्याप्रमाणेच ते कोणत्या वस्तूंचे असेल हे सांगणे कठीण नाही. इंग्रजीत अशा वस्तूंना "इंटरमिजिएट गुड्स" असे म्हणतात. माणसाच्या मूलभूत गरजा एकदा भागल्या की अधिकाधिक सुखसोयी मिळविण्याचा हव्यास निर्माण होतो आणि त्याच प्रकारचे उत्पादन होत राहते, तसलेच उत्पादन फायदेशीर ठरते. उदाहरणार्थ, मोटारगाड्या, वातानुकूल यंत्रे, शीतकपाटे, दूरदर्शन वगैरे. अशा वस्तूंच्या निर्मितीसाठी ऊर्जा जास्त लागते आणि त्यांच्या वापरानंतर टाकाऊ माल, ज्याचे विघटन लवकर होणार नाही, असा टाकाऊ माल, खूप तयार होतो. ऊर्जा निर्मितीसाठी आणि टाकाऊ माल, कचरा यांची विल्हेवाट लावण्यासाठीही निसर्गाची खूप हानी होते, परिसरातील प्रदूषण वाढते.

शहरांची वाढ रोखण्यासाठी पंतप्रधान उपाययोजना करणार नसतील, तर आज जसे "इंटरमिजिएट गुड्स"चे उत्पादन वाढण्याला उत्तेजन देणे हे धोरण आहे, तेच पंतप्रधान चालू ठेवतील. त्यामुळे एकीकडे स्थानिक जनतेच्या मूलभूत गरजा पुरविण्याकडे लक्ष कमी होईल आणि परिसराच्या प्रदूषणात सतत वाढ होतच राहील.

म्हणूनच पंतप्रधानांच्या आर्थिक धोरणांमुळे एकूण वस्तूंचे उत्पादन व सुविधा यांच्यात वाढ झाली

तरी बहुसंख्य भारतीयांच्या नशिबी येईल श्वसनासाठी विषारी हवा, पिण्यासाठी दूषित पाणी, खाण्यासाठी प्रक्रिया केलेले, रसायने व विषे मारलेले अन्न आणि राहण्यासाठी कचरा आणि तंबाखू मळ यांनी गलिच्छ केलेला परिसर! ही परिस्थिती सुधारण्याला प्रयत्न पंतप्रधान करतील असे मला वाटत नाही!

ही परिस्थिती सुधारेल जेव्हा वस्तूंच्या उत्पादनाबरोबरच नैसर्गिक संसाधनांना दर्जा घसरणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल तेव्हा. यासाठी खरोखरच व्यापक, सर्वसमावेशक धोरणाची आवश्यकता आहे, केवळ व्यापक अर्थशास्त्राची नव्हे! उदा. सगळी सुपीक जमीन ही राष्ट्रीय संपत्ती आहे. वाढणाऱ्या शहरांखाली तिचा नाश होऊ नये असे धोरण हवे. सद्यस्थितीत ते शक्य नाही. जमिनीचे मालक तिचा वाटेल तसा उपयोग करण्यास मोकळे आहेत! अशा संसाधनांकडे राष्ट्रीय संपत्ती म्हणून पाहणे केवळ ज्या समाजात शिक्षण आणि संस्कार यांनी उच्च पातळी गाठली आहे, तिथेच शक्य होईल. व्यापक अर्थशास्त्राच्या पुरस्कर्त्यांनी जनतेची शैक्षणिक पातळी वाढविण्याकडे दुर्लक्षच केलेले आहे. नवे पंतप्रधानही सर्वसामान्य जनतेच्या शिक्षणाऐवजी थोड्या लोकांसाठी असणाऱ्या उच्च शिक्षणावरच भर देतील. राष्ट्रातील विषमता वाढण्यास असे धोरण पोषक होईल.

भारतातील निम्म्याहून अधिक जनता आजही आपल्या मूलभूत गरजा, दिवसेंदिवस तुटपुंज्या होत चाललेल्या नैसर्गिक संसाधनातून भागवीत असते. मात्र या गोष्टीकडे आधीच्या पंतप्रधानांप्रमाणेच आजचे पंतप्रधानही दुर्लक्ष करतील, याचीही मला खात्री आहे! नैसर्गिक संसाधनांची काळजी घेण्याची परंपरा आपण विसरलो आहो. म्हणून

या संसाधनांची प्रत, दर्जा आणि व्याप्ती वाढविण्याचे शिक्षण सर्वसामान्य जनतेला मिळाले पाहिजे, त्याची जाणीव यंत्रणांच्या धोरणात असणार नाही.

वस्तू आणि सुविधा यांचे उत्पादन वाढविण्याचे मूळ धोरण असले की त्यासाठी तंत्रज्ञानाची अधिकाधिक कास धरणे अपरिहार्य होते. तंत्रज्ञानासाठी अर्थातच ऊर्जेचा वापर वाढतो. नवीन अर्थशास्त्राप्रमाणे नैसर्गिक संसाधनांचे ऊर्जेच्या साहाय्याने परिवर्तन करून जे उत्पादन काढले जाते, त्यामध्ये खर्च हा विक्री-मूल्यापेक्षा नेहमीच जास्त असतो. तेव्हा ऊर्जेचा वापर अत्यंत काटकसरीने व्हावा. तसेच नवीन अर्थशास्त्राप्रमाणे नफा, सतत वाढता नफा, हा इतरांना तोटा सोसायला लावूनच केला जातो. निव्वळ नफा असूच शकत नाही! निसर्गातील मूळभूत तत्त्वांवर आधारीत असे हे नवे शास्त्र, त्यातील पुरेशा गांभीर्याविषयी यंत्रयंत्रणांपर्यंत पोचलेले असेल, असे मला मुळीच वाटत नाही. त्यामुळे ऊर्जेची काटकसर करण्याचे धोरण ते आखतील, असे मला वाटत नाही. त्यामुळे अर्थातच उत्पादनखर्च वाढत जाईल आणि त्याबरोबरच महागाईही.

नव्या अर्थशास्त्राप्रमाणे केवळ स्थानिक निसर्गसंपत्तीवर आधारलेले आणि स्थानिक गरजा पुरविणारे उत्पादन सर्वोत्तम, एवढेच नाही, तर जे उत्पादन निसर्गातील सर्व प्रक्रियांना नैसर्गिक आविष्कार चालू ठेवून काढले जाईल, तेच सर्वोत्तम ~~होय~~ असे मानले जाते. उत्पादनासाठीचे तंत्रज्ञान असे हवे की ज्यामुळे नैसर्गिक प्रक्रियांना बाधा येणार नाही. थोडक्यात म्हणजे तंत्रज्ञान पर्यावरण-रक्षणास अनुकूल असे हवे. ज्या चिरकालीन टिकणे आवश्यक आहे, अशा नैसर्गिक प्रक्रिया म्हणजे हवा आणि वातावरण

यांचे संतुलन, जलचक्र (पृष्ठभागावरील आणि पृष्ठ-
-भागांतर्गत), मातीची सुपीकता व तिचे पुनर्भरण,
निसर्गाच्या निरनिराळ्या घटकांतून होणारे अन्नांशाचे
चलनवलन, या घटकांमधील परस्पर संबंध. उदाहरणार्थ,
कीटक व पशुपक्षी यांच्याकडून होणारे वनस्पतींचे पराग
आणि बीजवहन आणि या घटकांची कचरा, टाकाऊ
माल आणि प्रदूषण पचविण्याची क्षमता. या सर्व प्रक्रियांना
बाधा येणार नाही अशी कृती मानवाकडून हवी!

या प्रक्रियांना वाव द्यायचा म्हणजे उत्पादन
पद्धतीत आमूलाग्र बदल हवा. अशा बदलाला पुरस्कार
करणारे नवे अर्थशास्त्र आणि त्यानुसार आवश्यक अशी
धोरणे नव्या पंतप्रधानांना भावली असतील असे मला
मुळीच वाटत नाही!

एकूण काय, वाजपेयी सरकारच्या धोरणात क्रांति-
-कारक बदल पंतप्रधान करू शकणार नाहीत. ते
मलमपट्टी जरूर करतील पण गरीबांच्या, निसर्गाच्या
जखमा त्यामुळे भरून येणार नाहीत, बऱ्याही होणार
नाहीत.

असे हे माझे आडाखे! पंतप्रधान काय करू
शकणार नाहीत, याबाबतचे!! पाहू या, पंतप्रधान
माझे आडाखे चुकीचे ठरवितात का?

प्रकाश गोळे
९ब अभिमानश्री सोसायटी,
पाषाण रस्ता, पुणे-८.

~~Articl~~

Article by Prof Prakash Gole